# दि अण्णासाहेब सावंत को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि., महाड साठी लेखनिक भरती

रायगड जिल्हा व लगतचे ठाणे, पुणे, सातारा, रत्नागिरी जिल्हे व नवी मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन एरिया हे कार्यक्षेत्र असणाऱ्या दि अण्णासाहेब सावंत को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लिमिटेड या बँकेस रायगड, पुणे व रत्नागिरी या जिहयातील २४ शाखांकरिता लेखनिक पदासाठी उमेदवारांची भरती करावयाची आहे. यासाठी पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., पुणे; महाराष्ट्र व्दारे घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेव्दारे आणि मुलाखतीव्दारे निवड करण्यात येईल. सदर नियुक्ती बँकेच्या कार्यक्षेत्रात कुठेही करण्यात येईल.

---

खालीलप्रमाणे पात्रता असलेल्या उमेदवारांनी सदर जाहिरात प्रसिध्द झालेपासून १५ दिवसात **www.punebankasso.com** या वेबसाईटवर दि अण्णासाहेब सावंत को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लिमिटेड साठी दिलेल्या जाहिरातीचे खाली दिलेल्या **Click to apply** येथे आपले अर्ज भरावेत.

१. **पदसंख्या** :– ३०

२. **आवश्यक पात्रता** :–

अ) कोणत्याही शाखेची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी,

ब) MS-CIT/समतुल्य प्रमाणपत्र (Equivalent Certification Course) अभ्यासक्रम परिक्षा उत्तीर्ण आवश्यक,

क) वयोमर्यादा :– किमान २२ ते ३५ वर्षे (दिनांक २८/०२/२०२६ पर्यंत )

३. **अनुभव** :– बँका/पतसंस्था/ इतर वित्तीय संस्थातील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

४. **प्राधान्य** :– JAIIB/CAIIB/GDC&A असल्यास प्राधान्य,

५. **परीक्षा शुल्क** :– रु. 1,829/- ( जी. एस. टी सह ) ( Non-refundable )

६. **परिक्षा पध्दती** :– ऑनलाईन,

७. **परीक्षेचे ठिकाण** :– पुणे,

८. **परीक्षेचे स्वरुप** :– आय. बी. पी. एस. धर्तीवर असेल, त्यामध्ये १०० गुणांचे सर्व प्रश्न ऑब्जेक्टीव्ह स्वरुपाचे असतील. सर्वसाधारणपणे टेस्ट ऑफ रिझनिंग, जनरल बँकिंग ज्ञान, संगणक ज्ञान, न्युमरिकल ॲप्टीटयुड, क्लेरीकल ॲप्टीटयुड, जनरल नॉलेज, इंग्रजी ज्ञान या विषयांचा समावेश राहील.

पात्रता निकषात न बसणाऱ्या उमेदवारांनी अर्ज भरल्यास अथवा भरलेली माहिती चुकीची आढळल्यास संबंधित अर्ज बाद करण्यात येतील, तसेच त्यासाठी भरण्यात आलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत दिले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरुप इत्यादीबाबतची माहिती पात्र उमेदवारांना त्यांचे ई-मेलद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.